जा.क्र.-३००४/२०२६

—: जाहिर निविदा :—

जिल्हा न्यायालय, श्रीगोंदा मुख्यालयातील न्यायालयाच्या छतावर बसविण्यात आलेल्या पाण्याच्या टाक्यांची संख्या व न्यायीक अधिकारी यांचे शासकीय निवासस्थानामधील छतावर असलेल्या पाण्याच्या टाक्यांची एकुण संख्या १६ आहे. तसेच न्यायालयामध्ये जमीनीवर असलेले पाण्याचे हौदाची संख्या ०६ आहे असे एकुण १६ पाण्याच्या टाक्यांची संख्या असुन ०६ हौद आहेत. ते स्वच्छ करणेकरिता वार्षीक करार करणे आवश्यक आहे. तसे स्थानिक बाजारपेठेतील अधिकृत पाण्याच्या टाक्या व हौद स्वच्छ धुवुन देणा—या फर्मकडुन एक वर्ष (Annual Maintenance Contract) करीता दरपत्रके मागविण्यात येत असुन त्यासाठी खालील अटी व शर्ती लागु राहतील.

त्याबावतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे

१. आपल्या फर्मचा परवाना असणे आवश्यक आहे.

२. आपले फर्मचे नावाने पॅन व टॅन असणे आवश्यक आहे.

३. आपल्या फर्मचे नावाने जी.एस.टी. असणे आवश्यक आहे.

४. आपल्या वस्तुचे दरपत्रक सिलबंद पाकीटात देणे आवश्यक आहे.

५. सिलबंद पाकीटावर दरपत्रक कशाचे आहे ते लिहिणे आवश्यक आहे.

६. सिलबंद पाकीटावर मा.जिल्हा न्यायाधीश — १ व अति. सत्र न्यायाधीश,जिल्हा व अति. सत्र न्यायालय, श्रीगोंदा यांचे नाव व पत्ता लिहिणे आवश्यक आहे

७. सिलबंद पाकीटे स्वत: अथवा आपल्या प्रतिनिधी/पोस्टाद्वारे या कार्यालयाच्या आवक टेबलकडे आणुन दयावेत.

८. दरपत्रकामध्ये यादीतील सर्व वस्तुंचे दर लिहिणे आवश्यक आहे. अपूर्ण दरपत्रक नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आलेला आहे.

९. सदरहु दरपत्रक दिनांक २०/०७/२०२६ रोजी सायंकाळी ०६—०० पर्यंत देणे आवश्यक आहे.

१०. तत्पर व जलद सेवा देण्या—या फर्मना प्राधान्य देण्यात येईल.

११. दरपत्रकाबाबत दबाव आणण्याचा प्रयत्न करु नये अन्यथा दरपत्रक नाकारण्याचा अधिकार जिल्हा न्यायालय, श्रीगोंदा यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

१२. कोणतेही कारण न देता दरपत्रक अस्विकार करणेचा अधिकार जिल्हा न्यायालय, श्रीगोंदा या कार्यालयाकडे राखुन ठेवलेला आहे.

१३. ज्यांचे दरपत्रक वरील अटींचे व शर्तीची पूर्तता करुन कमी दराचे असेल त्याचेच दरपत्रक स्विकारण्यात येईल.

सदरचे दरपत्रक सोमवार दिनांक २०/०७/२०२६ रोजी सायंकाळी ०६—०० पर्यंत मा. जिल्हा न्यायाधीश — १ व अति. सत्र न्यायाधीश, श्रीगोंदा यांचे कार्यालयात आणुन देणे आवश्यक आहे.

जिल्हा न्यायालय, श्रीगोंदा
दिनांक : ०६/०७/२०२६

जिल्हा न्यायाधीश—१
व अति. सत्र न्यायाधीश,
श्रीगोंदा

प्रत :

१. मा. जिल्हा न्यायालय, श्रीगोंदा
२. मा. मुख्य अधिकारी, नगर परिषद, श्रीगोंदा
३. मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा
४. मा. उप कोषागार अधिकारी, श्रीगोंदा
५. जिल्हा न्यायालय, अहमदनगर ई—कोर्ट साईट.